महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.org.in | Email: director.msbae@gmail.com

**Maharashtra State**
**Board of Art Education, Mumbai**
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.org.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/ शाऊप २०२५/ /पाच/ १३९ दिनांक:- २५.०२.२०२५

परिपत्रक

शासकीय उच्चकला परीक्षा २०२५ करिता कला परिसंस्थांची नोंदणी, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवदेनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत...

राज्यातील विविध कला परिसंस्थांमध्ये दृककलेतील पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत शासकीय उच्चकला पदविका २०२५ चे आयोजन माहे एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने, सर्व कला परिसंस्थांचे अधिष्ठाता/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या शासकीय उच्चकला परीक्षेकरिता कला परिसंस्थांनी ऑनलाईन नोंदणी करावयाची आहे. त्याकरिता पुढीलप्रमाणे ऑनलाइन लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

https://mis.msbae.in/

०२. कला परिसंस्थेची ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अधिष्ठाता/प्राचार्य यांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर तसेच ई-मेलवर गोपनीय युजरनेम व पासवर्ड प्राप्त होतील. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी प्रथमत: प्राप्त होणारा पासवर्ड Reset करुन घ्यावा. तसेच, सदर युजरनेम व पासवर्ड गोपनियरित्या जतन करुन ठेवावेत.

०३. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी युजरनेम व पासवर्ड द्वारे लॉग-इन करुन आपल्या कला परिसंस्थेमधील उच्चकला परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

०४. परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करतांना विद्यार्थ्याचे पूर्ण नाव अचूकपणे नमूद करावे. प्रथम आडनांव, नंतर स्वत: चे नाव व शेवटी वडील/पतीचे नाव या क्रमाने विद्यार्थ्याच्या नावाची नोंदणी करावी. ए.टी.डी. द्वितीय वर्षाचे परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना संबंधित विद्यार्थी ए.टी.डी. प्रथम वर्षाच्या परीक्षेस ज्या नावासह प्रविष्ठ झाला/झाली असेल तेच नाव द्वितीय वर्षाचे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करतांना नमूद करावे. **गतवर्षीप्रमाणे यावर्षीही, ए.टी.डी. द्वितीय वर्ष जुना व नविन अभ्यासक्रम अशा दोन्ही अभ्यासक्रमांची स्वतंत्र परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे, जे विद्यार्थी ए.टी.डी. प्रथम वर्षाची परीक्षा जुन्या अथवा नविन यापैकी ज्या अभ्यासक्रमास उत्तीर्ण झाले असतील, अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे त्यानुसारच अचूकपणे सादर करावेत.**

०५. कला परिसंस्थांचे अधिष्ठाता/प्राचार्य यांनी उच्चकला परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र ठरणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर केले असल्याची खात्री करावी. तसेच, कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. अशाप्रकारे विद्यार्थ्यांची परिपूर्ण आवेदनपत्रे सादर केल्यानंतर त्यांचे एकत्रित परीक्षा शुल्क ऑनलाईन भरणा करण्याची सुविधा उपरोक्त लिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थी संख्येनुसार संबंधित कला संस्थेने अदा करावयाचे विहीत परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने खालील तपशीलानुसार दिलेल्या कालावधीतच नोदंणी करणे अनिवार्य असल्यामुळे त्यानंतर नाव नोदंणी करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

०६. कला परिसंस्थेची नोंदणी, कला परिसंस्थेमार्फत विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करणे याबाबत पुढीलप्रमाणे कालावधी विहित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | कला परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे. | दिनांक ०१.०३.२०२५ ते ०५.०३.२०२५ |
| २ | परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करणे. (कला परिसंस्थेमार्फत) | दिनांक ०१.०३.२०२५ ते १५.०३.२०२५ |
| ३ | परीक्षा शुल्काचा एकत्रित ऑनलाईन भरणा करणे. (कला संस्थेमार्फत) | दिनांक ०६.०३.२०२५ ते १६.०३.२०२५ |

०७. कला परिसंस्थेची नोंदणी, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क इ. बाबी पुढील प्रक्रीयेकरिता आधारभूत असल्याने सदर बाबी विहित कालावधीत पुर्ण होण्याच्या अनुषंगाने संबंधित कला संस्थेचे अधिष्ठाता / प्राचार्य यांनी विशेष दक्षता घ्यावी. प्रस्तुत प्रकरणी संपूर्ण जबाबदारी अधिष्ठाता / प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक, परीक्षेचे सर्वसाधारण स्वरुप इ. बाबतच्या सूचना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

०८. महाराष्ट्र कला शिक्षण मंडळाकडून परीक्षेसंदर्भातील यापुढे निर्गमित करण्यात येणारी पत्रे, परिपत्रके व इतर परीक्षा विषयक आवश्यक माहिती उपरोक्त लिंकच्या होमपेजवर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे, सर्व संबंधितांनी उपरोक्त लिंकचे वेळोवेळी अवलोकन करावे.

(संदिप डोंगरे)
सचिव,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला संस्था. (सर्व)

प्रत,

१) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर.
४) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
५) निवड नस्ती.